PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Kunku
Year: 1937

Song: Jaidevi MangalaGauri
Lyricist: Shantaram Athavle

जय देवी मंगळागौरी
जय देवी मंगळागौरी
ओवाळीन सोनिया ताटी
ओवाळीन सोनिया ताटी
रतनाचे दिवे माणिकाच्या वाती
माणिकाच्या वाती हिरे या ज्योती
मंगळमुर्ती उपजली काया
प्रसन्न झाली अल्पायुषी राया
तिष्ठली राजबाळी
तिष्ठली राजबाळी अह्योपण द्यावया
जय देवी मंगळागौरी
हळदीची वाटी कुंकवाची लोटी
पुजेला गं आणिती जाईच्या कळ्या
पुजेला गं आणिती जाईच्या कळ्या
सोळा तिकटी सोळा दुर्वा
सोळा परीची पत्री
जाई जुई अबोली शेवंते नागचाफे
जाई जुई अबोली शेवंते नागचाफे
पुजेला गं आणिली
साळीचे तांदुळ मुगाची गं डाळ
आणिली खिचडी रांधिती नार
आपुल्या पतीलागी
आपुल्या पतीलागी
सेवा करिती फार
जय देवी मंगळागौरी

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*